# कार्यालय - जिल्हा दिव्यांग सक्षमिकरण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
जिल्हा परिषद, नविन प्रशासकीय इमारत, तळ मजला, रवी भवन समोर,
वेस्ट हायकोर्ट रोड,सिव्हील लाईन, नागपूर-४४०००१.

Email : ddsonagpur@gmail.com/dswozpnagpur@gmail.com Ph.No.07122564324


जा.क्र. जि.दि.स.वि /जिपना/दि.क.योजना शाखा/दिव्यांगांसाठी विवाह प्रोत्सा./2332 /२०२५-२६/ नागपूर दि. 31/ ३ /२०२६

---

प्रति,

गट विकास अधिकारी,

पंचायत समिती - नागपूर (ग्रामीण),

जिल्हा- नागपुर.

विषय :- ५% जि.प.सेस फंड दिव्यांग कल्याण योजनेअंतर्गत "दिव्यांग-दिव्यांग व्यक्तींना विवाहासाठी प्रोत्साहनपर अनुदान " या योजनेतील सन २०२५-२६ या वर्षात मंजूर दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ देण्याकरीता निधी वितरीत करणेबावत...

संदर्भ :- १) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.नागपुर यांचे तांत्रिक मंजुरी आदेश क्रं.२२०४ दि.१७.३.२०२६.
२) मा.जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प.नागपुर यांचे निधी वितरण आदेश क्रं.२३३७ दिनांक ३१.३.२०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयी ५% जि.प.सेस फंड दिव्यांग कल्याण योजनेअंतर्गत "दिव्यांग-दिव्यांग व्यक्तींना विवाहासाठी प्रोत्साहनपर अनुदान योजना" याकरीता सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात या योजनेचा लाभ लाभार्थ्यांना देण्याकरीता तालुकानिहाय zpfms प्रणालीद्वारे निधी आपल्याकडे वितरीत करण्यात आलेले आहे. याकरीता यासोबत मंजुर लाभार्थ्यांची यादी देण्यात येत आहे. आपणास वरील संदर्भ क्रं.१ व २ अन्वये निधी वितरण आदेश व तांत्रिक मंजुरी आदेश वितरीत करण्यात येत असून आदेशातील अटी व शर्ती नुसार कार्यवाही करण्यात यावी. मूळ कागदपत्रांची पडताळणी करुन लाभार्थ्यांचा अर्ज घेउुन लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा. दिव्यांग कल्याण योजनेतून लाभार्थ्यास दुबार लाभ देण्यात येऊ नये याची दक्षता घ्यावी..

सदर लाभार्थ्याची निवड यादीनुसार नियमानुसार सर्व कार्यवाही पुर्ण करुन अहवाल या कार्यालयास लवकरात-लवकर सादर करावा. सदर कामाचा मासिक प्रगती अहवाल दरमहा न चुकता सादर करावा.

सहपत्र :- लाभार्थी निवड यादी, निधी वितरण आदेश,
तांत्रिक मान्यतेचा आदेश

(सुखदेव ग.फोरती )
जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद नागपुर

प्रतिलीपी :- माहितीस सविनय सादर,

१. मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, समाज कल्याण समिती, जिल्हा परिषद, नागपुर.
२. मा.मुख्य लेखा वित्त अधिकारी,वित्त विभाग, जिल्हा परिषद, नागपूर.

जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, नागपूर

सन २०२५-२६ साठी ५% सेस फंड दिव्यांग कल्याण योजनेतर्गंत दिव्यांग - दिव्यांग विवाह प्रोत्साहन योजना

| अं.क्र | वर-वधु लाभार्थ्याचे नाव व पत्ता | दिव्यांग प्रवर्ग | विवाह दिनांक | लाभार्थ्याचे प्राप्त अर्ज दिनांक | अनुदान रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वर - रजत विष्णु मदने<br>मु.आठवा मैल म्हाडा कॉलोनी,<br>दवलामेटी नागपूर-४४००२३<br>मोब.नं.९९२२३३६१६५ /<br>७०६६१२४३०३<br>**आधार क्रं.४२७०६००७२२३४**<br>वधु-जया रमेश कोकुळे<br>मु.नेताजी चौक, बाबुपेठ, चंद्रपुर<br>ता.जि.चंद्रपुर-४४२४०१<br>**आधार क्रं.४८६६४०१२६७२३** | कर्णबधिर-९४<br><br><br><br><br><br>कर्णबधिर-१०० | २५/०२/२०२५ | आ.प्राप्त अर्ज<br>क्रं.-<br>दि.१०/२/२०२६ | ५०,००० | Noc प्राप्त आहे. |

(सुखदेव ग.कोरती)<br>
जिल्हा समाज कल्याण अधिकारी,<br>
जिल्हा परिषद,नागपुर

संदर्भ - १. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रं.डिबीटी २३१६/ प्र.क्रं.१३३/का.१४१७, दिनांक ५.१२.२०१६.

२. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेशासन निर्णय क्रं.डिबीटी - २०१६/ प्र.क्र.९०/वित्त-९, दि.९ जानेवारी २०१७.

३. ग्राम विकास व जलसंधारण विभाग,शासन निर्णय,क्रं.भविसे १०/२००५/प्र.क्रं.१९७/आस्था-३ मंत्रालय,मुंबई दि.१४ जुलै,२००५.

४. म.शा.ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.झेडपीए -२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९ , दि.७ ऑक्टोबर २०१७.

५. म.शा.ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,शासन निर्णय क्र.जिपद्ु २०१८/प्र.क्र.५४/वित्त-३, दि.२५ जून २०१८.

६. समाज कल्याण समिती सभा दि.०५.०५.२०२५, विषय क्रं.०३, ठराव क्रं.०१ .

७. समाज कल्याण समिती सभा दि.३०.०६.२०२५, विषय क्रं.०३, ठराव क्रं.०१.

८. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि.०४.०७.२०२५ मध्ये विषय क्रं.६(३), ठराव क्रं.०८.

९. समाज कल्याण समिती सभा दि.१८.०९.२०२५, विषय क्रं.०८, ठराव क्रं.०६.

१०.समाज कल्याण समिती सभा दि.५.३.२०२६.

११.या विभागाचे प्रशासकीय मंजुरी आदेश क्रं.२२०३, दि. १७/३/२०२६.

१२.या विभागाचे तांत्रिक मंजुरी आदेश क्रं.२२०४, दि. १७.०३.२०२६.

१३.सभा दि.२७.३.२०२६ रोजी सन २०२६-२७ चा सेस फंडाचा अर्थसंकल्प व सन २०२५-२६ चे सुधारीत अंदाज पत्रक.

१४.विभागाचे खर्च मंजूरी आदेश क्रं.जिदिसअ/जि.प.ना/दिव्यांग-दिव्यांग विवाह प्रो.अनु./दिव्यांग/मंजूरी/ जि.प. ५ टक्के सेस फंड /२३०३ / दि.३०/०३ /२०२६.

---

क्र.जिसकअ/जिपना/अ.वि/सेस फंड दि.विवाह/२०२५-२६/ २३२८

कार्यालय, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी,

जिल्हा परिषद, नागपूर

दिनांक :- ३१/०३/२६

**निधी वितरण आदेश**

वरील संदर्भ क्रं.६ अन्वये समाज कल्याण समिती सभा दिनांक ०५.०५.२०२५, विषय क्रं.०३, ठराव क्रं.०१ नुसार जिल्हा परिषद ५ टक्के सेस फंड योजनेत "दिव्यांग - दिव्यांग व्यक्तींना विवाहासाठी प्रोत्साहनपर अनुदान" या योजनेची निवड करण्यात येवुन योजना राबविण्याकरीता सभेत मंजूरी प्रदान करण्यात आली. संदर्भ क्रं.७ नुसार सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता प्राप्त अर्थसंकल्पीय तरतुद रु.२,५०,००० चे दि.३०.०६.२०२५ रोजी सभेत पुर्ननियोजन करुन खर्च करण्यास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली. संदर्भ क्रं.८ अन्वये जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक ०४.०७.२०२५ रोजी विषय क्र.६(३), ठराव क्रं.०८, नुसार सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता या योजनेवर पुर्ननियोजनानंतर प्राप्त अर्थसंकल्पीय तरतूद रु.२,५०,००० (अक्षरी रु.दोन लक्ष पन्नास हजार फक्त) करण्यात आले असून खर्च करण्यास प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर योजनेचा लाभ देण्याकरिता संदर्भ क्र.९ व १० अन्वये समाज कल्याण समिती सभा दि.१८.०९.२०२५ व दिनांक ५.३.२०२६, विषय क्रं.(११), ठराव क्रं.(९) अन्वये सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात लाभार्थी मंजूर करण्यात आलेले आहे. "दिव्यांग- दिव्यांग व्यक्तींना विवाहासाठी प्रोत्साहनपर अनुदान" या योजनेवर जिल्हा परिषद ५ टक्के सेस फंड निधीतून सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात रु.२,५०,०००/- तरतूद प्राप्त असून संदर्भ क्रं.११ व १२ अन्वये विभागाने मा.जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प.नागपूर यांची प्रशासकीय व तांत्रीक मंजूरी आदेश घेण्यात आली आहे. निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना DBT द्वारे लाभ देण्याकरीता गट विकास अधिकारी, पंचायत समितींना ही योजना राबवयाची आहे. संदर्भ क्रं.१३ अन्वये सुधारीत अंदाजपत्रकात या योजनेस रु.२,५०,००० तरतुद ठेवण्यात आली आहे. संदर्भ क्रं.१४ अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नागपूर यांची या योजनेवर खर्च मंजूरी घेण्यात आली आहे.

प्रति विवाहीत जोडप्यांना रु.५०,०००/- अर्थसहाय्य निश्चित करण्यात आलेले आहे. करिता मी जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर हे खालीलप्रमाणे ०१ विवाहीत जोडप्यांना लाभ देण्याकरिता संबंधीत गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना एकुण रु.५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) निधी वितरणास मंजूरी प्रदान करीत आहे.

| अ.क्र | तालुका | मंजूर लाभार्थी जोडपे संख्या | एकुण रक्कम जोडप्यांना रु.५०,०००/- प्रमाणे वितरीत करणे |
|---|---|---|---|
| १ | नागपूर(ग्रा) | 01 | 50,000/- |
| | एकुण | 01 | 50,000/- |

( कृ.मा.प.)

वैयक्तीक लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून लाभार्थ्यांना लाभ द्यावयाचा आहे.तरी मंजूर यादीतील लाभार्थी लाभ घेण्यास पात्र असल्याबाबत खात्री करुन संबंधीत मंजूर विवाहीत जोडप्यांच्या आधार कार्ड क्रमांकाशी संलग्न असलेल्या बँक खात्यास रु.५०,०००/- च्या मर्यादेत रक्कम जमा करण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे अटी व शर्तीच्या अधिन राहून गट विकास अधिकारी पंचायत समिती यांनी आपले स्तरावरुन करावी.

**अटी व शर्ती -**

१. जिल्हा परिषद समाज कल्याण समितीने मंजूरी दिलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांनी त्यांच्या अर्जात सादर केलेली माहिती परिपूर्ण व सत्य असल्याबाबतची पडताळणी करावी. संबंधित लाभार्थ्यांनी त्यांचे स्वत:चे नावाने राष्ट्रीयकृत बँकेत सयुक्त खाते उघडणे तसेच खाते आधार क्रमांकाशी संलग्न करण्यास लाभार्थ्यास कळविण्यात यावे.

२. योजनेच्या अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहे.

**अ.** दिव्यांग विवाहीत जोडपे दिव्यांग जोडप्यांपैकी किमान एक व्यक्ती नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रहीवासी असावा.

**ब.** दिव्यांग विवाहीत जोडपे दिव्यांग असल्याबाबतचे दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र वैद्यकीय मंडळाचे असणे आवश्यक आहे. दिव्यांगत्व टक्केवारी कमीत कमी ४० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक टक्केवारीचे असणे आवश्यक आहे.

**क.**दिव्यांग जोडप्यांचे आधार कार्ड, शाळा सोडल्याचा दाखला, विवाह नोंदणी दाखला, लग्नाचा फोटो असणे आवश्यक आहे.

ड.विहीत केलेला रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र (यापूर्वी या योजनेचा लाभ शासकीय कार्यालयातून तसेच बाहेरच्या जिल्हयातून या योजनेचा लाभ न घेतलेबाबत NOC )

ई. प्रचलीत नियमानुसार विवाहाच्या दिनांकास जोडप्यांचे वय असणे बंधनकारक आहे.

३.संबंधित विवाहीत जोडप्यांकडून आवश्यक सर्व कागदपत्रांची पुर्तता होणे बंधनकारक आहे.

४.दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ दिल्याबाबतच्या नोंदी नोंदवहीमध्ये नोंदविण्यात यावे. याबाबत जिल्हास्तरावरुन नियमानुसार तपासणी करण्यात येईल.

५.विवाहच्या मुळ दाखल्यावर व इतर मुळ कागदपत्रांवर मागच्या बाजुने विवाह योजनेत दिव्यांग- दिव्यांग विवाह योजनेचा लाभ दिल्याचे पंचायत समितीकडुन शिक्के मारण्यात यावे.

६. सदर खर्च सन २०२५-२६ या वित्तिय वर्षात उपलब्ध तरतूदीमधून करण्यात यावा.

७. सदर खर्च ५ टक्के दिव्यांग कल्याण सेस फंड निधी मधून करण्यात यावा.

वरिल प्रमाणे अटी शर्ती च्या अधिन राहून गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना निधी वितरण आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

(सुखदेव ग. कौरती)
जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, नागपूर.

प्रतिलिपी -

१.मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
२.गट विकास अधिकारी, पंचायत समिती ------------------- यांना माहिती व कार्यवाहीकरिता.

जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, नागपूर.

**कार्यालय - जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर**
जिल्हा परिषद, नविन प्रशासकीय इमारत, तळ मजला, रवी भवन समोर,
वेस्ट हायकोर्ट रोड, सिव्हील लाईन, नागपूर-४४०००१.
Email :dswozpnagpur@gmail.com Ph.No.०७१२-२५६४३२४

संदर्भ :- १) ग्राम विकास व जलसंधारण विभाग,शासन निर्णय,क्रं.भविसे १०/२००५/प्र.क्रं.१९७/आस्था-३ मंत्रालय,मुंबई दि.१४ जुलै,२००५.
२) म.शा.ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९ , दि.७ ऑक्टोबर २०१७.
३) म.शा.ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,शासन निर्णय क्र.जिपदु २०१८/प्र.क्र.५४/वित्त-३, दि.२५ जून २०१८.
४) समाज कल्याण समिती सभा दि.०५.०५.२०२५, विषय क्रं.०३, ठराव क्रं.०१ व सभा दि.३०.०६.२०२५, विषय क्रं.०३, ठराव क्रं.०१.
५) जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि.०४.०७.२०२५ मध्ये विषय क्रं.६(३), ठराव क्रं.०८.

---

जिसकअ/सकवि/दिव्यांग ५% / प्रशा.मंजुरी/ योज./२०२५-२६/दिव्यांग विवाह- प्रोत्सा.अनु./ २२०४ / दि.१७/३/२०२५

## तांत्रीक मान्यता आदेश

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हा परिषदेच्या खात्याचे नाव | जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद,नागपूर |
| २ | योजनेचे नाव व उद्दीष्ट (थोडक्यात) | दिव्यांग - दिव्यांग व्यक्तींना विवाहासाठी प्रोत्साहनपर अनुदान |
| ३ | योजना राबविण्याचा कालावधी | सन २०२५-२६ |
| ४ | योजनेचे तंत्र व मर्यादा | नागपूर जिल्हा अंतर्गत ग्रामीण भाग |
| ५ | योजनेचे उद्देश व कारण मिमांसा | दिव्यांग-दिव्यांग विवाहीत जोडप्यांना प्रोत्साहनपर अर्थसहाय्य करणे. |
| ६ | योजनेच्या अटी | १.विवाहीत जोडप्यांपैकी दोन्ही व्यक्ती दिव्यांग असावेत.<br>२.दोन्ही दिव्यांग व्यक्ती (वर / वधु) ही ग्रामीण भागातील ग्रामपंचायत मधील, नागपुर जिल्हयातील रहिवासी (स्थानिक अधिवास) असल्यास अशांना प्राधान्य क्रमाने लाभ देण्यात येईल.<br>३.दिव्यांग व्यक्तीपैकी किमान एक व्यक्ती नागपूर जिल्हयातील ग्रामीण भागातील रहिवासी असावा. (नागपूर जिल्हयातील स्थानिक अधिवास असलेली दोन्ही दिव्यांग व्यक्तीपैकी (वर/ वधु) जी ग्रामीण-शहर अथवा शहर- ग्रामीण असे वास्तव्यास राहणाऱ्या व्यक्तींसाठी या योजनेत लाभ देण्यात येईल)<br>४.वैद्यकीय दिव्यांग महामंडळाचे प्रमाणपत्र अथवा ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र असावे. दिव्यांगाची टक्केवारी ४०% किंवा त्यापेक्षा जास्त असावी.<br>५.नागपूर जिल्हयातील वर अथवा वधु या दोघांपैकी एक कायम ग्रामीण अधिवास असणारी असेल अशावेळी नागपूर जिल्हयाच्या व्यक्तीरिक्त वधु किंवा वर या दोघांपैकी एक हे या जिल्हयातील नसून दुसऱ्या- जिल्हयातील / दुसऱ्या राज्यातील अधिवास असणारी असल्यास त्यांना या योजनेचा लाभ देता येईल. |
| ७ | योजनेच्या अंतर्गत लाभार्थ्यांचा स्वतःचा सहभाग तथा वर्गणी | १०० टक्के अनुदानावरील योजना |
| ८ | योजनेची संभाव्यता | रु.२,५०,०००/- |
| | अ) योजना शासनाच्या कोणत्या विभागाखाली राबविण्यात येत आहे | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर |
| | ब) खर्चाचे जिल्हा परिषद हिशेबातील मुख्य सदर दुय्यम शिर्षक, प्राथमिक युनिट आणि योजनेचे नाव | दिव्यांग कल्याण.<br>जि.प.५ टक्के सेस फंड<br>"दिव्यांग - दिव्यांग व्यक्तींना विवाहासाठी प्रोत्साहनपर अनुदान" |
| ९ | खातेप्रमुखाचे योजनाबाबतचे अभिप्राय | समाजातील दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींना सर्वसाधारण व्यक्तींप्रमाणे आपले कौटुंबिक जीवन व्यतीत करता यावे, यासाठी दिव्यांग- दिव्यांग विवाहीत जोडप्यांना अर्थसहाय्य करुन विवाह करण्यास प्रोत्साहन देणे. |

(P.T.O)

भाग २ व ३

वरील संदर्भ क्रं.४ अन्वये समाज कल्याण समिती सभा दिनांक ०५.०५.२०२५, विषय क्रं.०३, ठराव क्रं.०१ नुसार जिल्हा परिषद ५ टक्के सेस फंड योजनेत "दिव्यांग- दिव्यांग व्यक्तींना विवाहासाठी प्रोत्साहनपर अनुदान" या योजनेची निवड करण्यात येवुन योजना राबविण्याकरीता सभेत मंजूरी प्रदान करण्यात आली. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता प्राप्त अर्थसंकल्पीय तरतुद रु.२,५०,००० चे दि.३०.०६.२०२५ रोजी सभेत पुर्ननियोजन करुन खर्च करण्यास प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी प्रदान करण्यात आली. संदर्भ क्रं.५ अन्वये जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक ०४.०७.२०२५ रोजी विषय क्र.६(३), ठराव क्रं.(०८) नुसार सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता या योजनेवर पुर्ननियोजनानंतर प्राप्त अर्थसंकल्पीय तरतूद रु.२,५०,००० (अक्षरी रु. दोन लक्ष पन्नास हजार फक्त) करण्यात आले असून खर्च करण्यास तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

म.शा.ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. झेडपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९, दिनांक ७ ऑक्टोंबर २०१७ मधील भाग-४(२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर ५ टक्के जिल्हा परिषद सेस फंड (दिव्यांग कल्याण) अंतर्गत सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात "दिव्यांग- दिव्यांग व्यक्तींना विवाहासाठी प्रोत्साहनपर अनुदान" या योजनेवर पुर्ननियोजनानंतर प्राप्त अर्थसंकल्पीय तरतूद रु. २,५०,००० (अक्षरी रु. दोन लक्ष पन्नास हजार फक्त) ला तांत्रीक मंजूरी प्रदान करीत आहे.

सदर खर्च खालील लेखाशिर्षाअंतर्गत सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात खर्च करण्यात यावा.

लेखाशीर्ष :- जिल्हा परिषद ५ टक्के सेस फंड
"दिव्यांग- दिव्यांग व्यक्तींना विवाहासाठी प्रोत्साहनपर अनुदान"

(सुखदेव ग.कौरती)
जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, नागपूर

प्रतिलिपी :-
१) मा.मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नागपुर यांना माहितीकरिता सविनय सादर .
२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व).

जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, नागपूर